ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

January - 2020
Vol. I No. 13

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

ijindex

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

January - 2020
Vol. I No. 13

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

## CHIEF EDITOR

**Dr. Vaishali S. Pradhan**
Principal, Milind College of Arts, Nagsenvana, Aurangabad.

## EDITORIAL BOARD

**Dr. Santosh P. Burkul**
Associate Professor,
Department of Geography,
Milind College of Arts,
Nagsenvana, Aurangabad

**Dr. Feroz S. Pathan**
Senate Member, Dr. BAMU, Aurangabad.
Associate Profess ,
Department of Political Science,
Milind College of Arts, Nagsenvana,
Aurangabad

**Dr. B. B. Surajbansi**
Assistant Professor,
Department of Socioligy,
Milind College of Arts,
Nagsenvana, Aurangabad

**Satish K. Kharat**
Assistant Professor,
Department of Histiry,
Milind College of Arts,
Nagsenvana, Aurangabad

**Dr. Swati H. Kekare**
Assistant Professor,
Department of Psychology,
Milind College of Arts,
Nagsenvana, Aurangabad

**Dr. Madhukar G. Shinde**
Assistant Professor,
Department of Psychology,
Milind College of Arts,
Nagsenvana, Aurangabad

**Dr. Vanmala R. Tadvi**
Assistant Professor,
Department of Geography,
Milind College of Arts,
Nagsenvana, Aurangabad

**Dr. Sukhadeo M. Khandare**
Assistant Professor,
Department of Economics,
Milind College of Arts,
Nagsenvana, Aurangabad

# अनुक्रमनिका


निवडणूकामध्ये होणारा पैशाचा गैरवापर : लोकशाहीपुढील गंभीर आव्हान
**गायकवाड गौतम गोविंद** 1

महिला सक्षमीकरण आणि भारतीय लोकशाही पुढील आव्हाने
**डॉ.सुधीर ब.गायकवाड** 4

भारतीय लोकशाही पुढील आव्हाने
**खंदारे एन.व्ही.** 8

भारतीय लोकशाही समोरील आव्हाने
**कु. पुजा धोंडीबा कोरे** 12

राजकारणातील भ्रष्टाचार - एक समस्या
**प्रा.डॉ.गजानन हनवते** 15

भारतीय लोकाशाहीपुढे दहशतवादाचे आव्हान
**प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे डॉ. महादेव गव्हाणे** 18

भारतीय लोकशाही समोरील आव्हाने
**कु. पुजा धोंडीबा कोरे** 21

ग्रामीण विकास आणि शासनाच्या योजना
**डॉ. वैशाली शेषराव पेरके** 24

भारतीय लोकशाही समोरील भ्रष्टाचार एक आव्हान
**डॉ. प्रशांत भाऊसाहेब सोळंके** 28

भारतीय लोकशाहीपुढील भ्रष्टाचार एक आव्हान
**प्रा.गौतम कांबळे** 31

भारतीय लोकशाहीपुढे दहशतवादाचे आव्हान
**प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे डॉ. महादेव गव्हाणे** 34

अहमदनगर जिल्हयातील पक्षीय राजकारण : एक चिकित्सक अभ्यास
श्री. एकनाथ सीताराम निर्मळ 38

**ईव्हीएम मशीन : लोकशाहीसमोरील एक आव्हान**
**रावसाहेब रतन चव्हाण** 41

# भारतीय लोकशाहीपुढे दहशतवादाचे आव्हान

प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे

डॉ. महादेव गव्हाणे

लोकसत्ता किंवा लोकशाही म्हणजे लोकांची सत्ता असलेले राज्य होय. राज्यातील सर्व लोकांना शासन कारभारात समाविष्ट करुन घेणारा शासन प्रकार म्हणून लोकशाहीकडे पाहिले जाते. लोकशाहीशिवाय अन्य कोणत्याही शासन प्रकारात संपूर्ण लोकसमुदायाला राजकीय प्रक्रियेचा भाग होता येत नाही. मात्र लोकशाहीत निवडणूका आणि मताधिकाराच्या माध्यमातून सर्व लोकांना राजकीय सहभागित्वाची संधी मिळते. राज्याला विरोध करण्याचा आणि शासनसंस्थेवर नियंत्रण ठेवण्याचा अंतिम अधिकार लोकांना लोकशाहीतच असतो. म्हणूनच लोकशाही हा सर्वाधिक लोकप्रिय शासन प्रकार म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता इत्यादी मूल्यांना जोडणारी व्यवस्था म्हणून लोकशाहीला ओळखले जाते.

लोकशाही हा आजचा सर्वाधिक लोकप्रिय शासन प्रकार आहे. लोकशाही हे इंग्रजी अस्र्दीम्ह चे मराठी भाषांतर आहे. ग्रीक शब्द अस्दे म्हणजे लोक आणि र्र्ठी म्हणजे सत्ता या दोन शब्दापासून अस्र्दीम्ह हा शब्द तयार झाला. म्हणजेच ज्या शासनव्यवस्थेत लोकांची प्रत्यक्ष सत्ता असते. सत्तेत लोकांचा सहभाग असतो. ती लोकशाही होय. जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. लोकशाहीत जनता केंद्रबिंदू मानून प्रतिनिधीने जनहिताला प्राधान्य देऊन व्यवस्था चालवावी ही अपेक्षा असते. जनतेच्या संमतीनुसार चालणारे शासन महणजे लोकशाही शासन. लोकशाहीमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही प्रमुख तत्वे सांगितले आहेत. समतेमुळे मानवनिर्मित विषमता नष्ट होते. सर्वांगिण विकासाची संधी प्राप्त होते. बंधुता म्हणजे सर्वजन राज्याचे समान घटक म्हणून वागणूक प्राप्त होते. त्यामुळे कायद्यासमोर व्यक्ती-व्यक्तीमध्ये भेदभाव करण्यात येत नाही. लोकशाहीने व्यक्तींना आपल्या अधिकाराची व कर्तव्याची जाणीव होते. लोक आणि शासनकर्ते जबाबदारीने कार्य करतात. लोकांचा विकास लोकशाहीतच होतो. म्हणून तिला कांही विचारवंत जीवनपध्दती असेही म्हणतात. आज भारत हे जगातील लोकसत्ताक देशांमधील सर्वात मोठे राष्ट्र आहे. काळाच्या ओघामध्ये भारतीय समाजव्यवस्था पाश्चात्यांच्या चंगळवादाकडे आकर्षित झाल्यामुळे आणि नैतिक मूल्यांच्या होत असणाऱ्या ऱ्हासामुळे भारतीय लोकशाहीपुढे अनेक आव्हाने उभी आहेत. चेस्टरटनच्या मते लोकशाही हा धोक्याचा व्यापार आहे. त्या अनेक धोक्यांपैकी दहशतवाद हा एक महत्त्वाचा धोका आहे त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. लोकशाहीसमोरील सर्वात महत्त्वाचे व कठोर आव्हान दहशतवादाचे आहे. मानवजातीला भेडसावणाऱ्या ज्या समस्या आहेत त्यात दहशतवाद ही प्रमुख समस्या आहे. दहशतवादाची समस्या एखाद्या राष्ट्रापूरती किंवा एखाद्या भागापूरती मर्यादीत राहिलेली नाही तर तीने आंरराष्ट्रीय स्वरुप धारण केले आहे. आज जगातील प्रत्येक

राष्ट्र दहशतवादाने प्रभावित आहे. कोणतेही राष्ट्र या समस्येपासून आज अलिप्त नाही. भारतासारख्या विकसनशिल देशात दहशतवादाची समस्या गंभीर बनली आहे. प्रत्येक राज्यात कमी-अधिक प्रमाणात दहशतवादाचा प्रभाव दिसून येतो. भारतात दहशतवादाची समस्या नवीन नाही. कालपरत्वे तिला हजारो वर्षाचा इतिहास आहे. आजच्या आधुनिक युगात राज्यपुरस्कृत दहशतवादाचे रुपांतर खाजगी संघटनात्मक दहशतवादात झालेले दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतात कांही क्रांतीकारी संघटनाद्वारे हिंसेच्या माध्यमातून राजकीय परिवर्तन घडवून आणण्याचा विचार विकसित झाला. त्या विचाराने स्वातंत्र्यानंतर हिंसेचे व्यापक स्वरुप धारण केलेले दिसते. देशाच्या विकासासाठी शांतता महत्त्वाची असते. शांततेशिवाय प्रगती होत नाही. पण दहशतवाद राष्ट्राच्या विकासाच्या मार्गातील प्रमुख अडथळा ठरत आहे.

**दहशतवादाचा अर्थ :-**

१) बेन्जामिन नेत्याहून :-

आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी निष्पाप लोकांची जाणून-बुजून आणि पध्दतशीरपणे केलेल्या हत्या व त्यांना जखमी करुन त्यांच्या अवयवांची केलेली भीषण मोडतोड म्हणजे दहशतवाद.

**२) स्वार्जन बर्जर :-**

दहशतवाद म्हणजे भीती निर्माण करण्याच्या उद्देशाने व शक्तीचा प्रयोग करुन आपले लक्ष प्राप्त करण्यासाठी केलेली कृती होय.

**३) जॉन क्रेटम :-**

राजकीय उद्दिष्टे साध्य करण्याकरिता समाजाच्या किंवा त्यातील विशिष्ट स्तरात भीती व दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने केलेली हिंसात्मक गुन्हेगारी वर्तणूक म्हणजे दहशतवाद होय.

**४) शेरीम वसीओनी :-**

एखाद्या विशिष्ट गटाचा प्रचार करण्यासाठी सर्वसामान्य जनतेत दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने केलेली हिंसक वर्तणुक म्हणजे दहशतवाद होय.

दहशतवादाचा अर्थ सांगताना सन झू - या चीनी तत्त्ववेत्याने अडीच हजार वर्षापूर्वी असे म्हटले की, खत्त दहा, Frighten Ten Thousand म्हणजे एकाला मारा आणि दहा हजारांना भयभीत करा, हा दहशतवादाचा प्रमुख उद्देश असतो. आपली उद्दीष्टो साध्य करण्यासाठी हिंसेच्या मार्गाचा अवलंब केला जातो. शस्त्रांच्या हिंसेच्या धाकाने कोणासही नमविता येऊ शकते, असा त्यांचा विश्वास असतो. कमीत-कमी वेळेत आपले ठरलेले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हिंसा ही अनिवार्य आहे ती कराविच लागते. ती टाळता येऊ शकत नाही. ती जीवनाचा अविभाज्य भाग आहे असे दहशतवादी मानतात. हिंसेचे समर्थन करण्यासाठी ऐतिहासिक घटनांचा संदर्भ देतात.

आम्ही अहिंसक मार्गाने प्रथम प्रयत्न केले. त्यामुळे कांहीच साध्य झाले नाही म्हणून नाईलाजाने आम्ही हिंसक दहशतवादी पध्दतीचा स्वीकार केला असेही समर्थन दहशतवादी संघटनांकडून केले जाते.

दहशतवादाचा कोणताही धर्म नसतो. ती एक प्रवृत्ती असते हे जरी सत्य असले तरी धर्माच्या आधारावर दहशतवाद पोसला जातो. जिहादला पवित्र युध्द समजणे चुकीचे ठरते. अरबी भाषेत जिहादचा अर्थ संघर्ष असा होतो. आत्म्याच्या नकारात्मक भूमिकेच्या विरुध्द केलेल्या संघर्षाला महंमद पौगंबरानी जिहाद म्हटले होते. परंतू आधुनिक काळात शासनकर्त्यांनी, दहशतवाद्यांनी त्याचा अर्थ धर्मसंघर्ष असा लावल्यामुळे आता हा संघर्ष सांस्कृतिक व धार्मिक बनला आहे. व्यक्तीस्वातंत्र्य, विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे दहशतवादी संघटनांना मान्यच नसते. स्वातंत्र्य हाच त्यांना फार मोठा अडथळा वाटतो. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या स्वातंत्र्याला या संघटना विरोध करत असतात. पण हे व्यक्तिस्वातंत्र्य त्यांना स्वतःला मिळालेच पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. दहशतवादी संघटना आपला हेतू साध्य करण्यासाठी साम-दाम-दंड-भेद अशा सर्वच मार्गांचा अवलंब करतात, साध्य महत्त्वाचे असते. साधने कोणतीही व कशीही असली तरी हरकत नाही हे सूत्र सर्व दहशतवादी संघटनांचे समान असते. आपले विचार इतरांवर लादणे, आपल्या म्हणण्यानुसार इतरांना वागण्यास भाग पाडणे हे साध्य करण्यासाठी दहशतीचा मार्गच योग्य आहे असे त्यांचे मत असते. शत्रुला नष्ट करण्यासाठी जे-जे करावे लागेल ते-ते केले पाहिजे व तसे करणेच योग्य आहे, असा विश्वास असतो. कायदा, न्याय, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही मूल्य यांची त्यांच्याकडून होणारी पायमल्ली योग्य मानली जाते. दहशतवादी संघटना आपले ध्येय साध्य करण्यासाठी संहारक शस्त्रास्त्रे प्राप्त करीत असतात. त्यासाठी लागणारा पौसा ते अंमली पदार्थांच्या व्यापारातून मिळतात. या पौशांच्या मदतीने शस्त्र मिळवणे व त्या शस्त्रांचा उपयोग करुन सत्तेतले सरकार उलथून टाकणे, आपल्या मर्जीतील सरकारला सत्तेवर आणणे, आपल्या मागण्या मान्य करुन घेणे, सत्ता प्राप्त करणे, त्यासाठी हजारो निष्पाप माणसांचा बळी घेतला जातो. दहशतवादाचे मुख्य सूत्र असते. एका निरपराध माणसाला ठार करा आणि हजारोंच्या मनात दहशत निर्माण करा. दहशतवादी संघटनेत सामील होणे सोपे असते परंतू बाहेर पडणे अवघड असते. मायकेल ऊर्फ बोम्मी ब्राऊमन हा दहशतवादी नेता असे म्हणतो की, दहशतवादातून बाहेर पडण्याचा मार्ग स्मशानातून जातो. खरं म्हणजे दहशतवादी जन्माला येत नसतात, ते विशेष सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीतून निर्माण होत असतात.

दहशतवाद हा अघोषित व अनियंत्रित युध्दाचाच प्रकार आहे. आधुनिक काळातील त्याचे स्वरुप हे अत्यंत चिंताजनक आहे. जवळजवळ प्रत्येक देशात कोणत्या ना कोणत्या दहशतवादी गटाचे आज अस्तित्व आहे. दहशतवादी संघटनांचे आपापसात सहकार्य असते. अत्याधुनिक तंत्रज्ञान, शस्त्रास्त्रे व अमाप पौसा असल्यामुळे या दहशतवादी संघटनांचे सामर्थ्यदेखील आज प्रचंड आहे. काही दहशतवादी संघटनांना राज्यसत्तांचा पाठिंबा असल्याने त्यांच्या सामर्थ्यात

वाढच झाली आहे. माहिती व सुसंचन्न माध्यमातील तंत्रज्ञान्नाचा या गटाद्वारे पुरेपुर प्रमाणात वापर केला जातो. लोकसंख्यावाढीमुळे सर्वांन्ना संरक्षण देणे हे राज्यसत्तेला अशक्य होऊ लागले आहे. त्यामुळे दहशतवादावर न्नियंत्रण ठेवणेही कठिण होत चालले आहे. कोण, कधी, कोठे बॉम्बस्फोट करेल आणि कोण, कधी, कोणत्या बॉम्बस्फोटात कोठे मृत्यूमुखी पडेल हे सांगता येत न्नाही. अशी परिस्थिती आजची आहे. त्यामुळेच दहशतवादाच्या समस्येकडे गांभिर्यान्ने लक्ष देणे आवश्यक आहे. जगातील सर्व राष्ट्रांन्नी आपापसातील मतभेद विसरुन्न जाऊन्न संपूर्ण जगातील दहशतवादाचे समुळ उच्चाटन्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी दहशतवादाविरुध्द संघटितपणे उभे राहण्याचे आत्मिक सामर्थ्य, आत्मविश्वास, धाडस, जन्नतेत न्निर्माण करणे आवश्यक आहे. देशाची एकता, शांतता आणि अखंडता अबाधित ठेवण्यासाठी स्वातंत्र्य, समता व न्याय या मूल्यांवर उभी असणारी लोकशाही सुरक्षित ठेवण्यासाठी न्नागरीकांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. सर्वांच्या सहकार्याशिवाय व सहभागाशिवाय दहशतवाद विरोधी लढा यशस्वी होणे कठिण आहे.

**संदर्भ सूची :-**


१) सावंत पी.बी. (अनु.), सावंत जयश्री, लोकशाहीचे व्याकरण, भाग्य प्रकाशन्न, मुंबई, २०१३.
२) मातापूरकर मो.गो., दहशतवाद तुमच्या घरात, इंद्रायणी साहित्य प्रकाशन्न, पुणे.
३) गिरीश कुबेर, धमन्युध्द, राजहंस प्रकाशन्न, पूणे २००९.
४) य.द. फडके, राजकीय दहशतवाद, अक्षर प्रकाशन्न, मुंबई, २०००.
५) म.न.उदगावकर, एकविसाच्या शतकातील दहशतवाद, डायमंड पब्लिकेशन्न, पुणे.
६) डॉ.वा.भा. पाटील, भारताचे परराष्ट्रीय धोरण, प्रशांत पब्लिकेशन्न्स, जळगाव, २०१५.
७) डॉ.बी.डी. तोडकर, भारत आणि जग, डायमंड पब्लिकेशन्न्स, पुणे २०१०.
८) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारत आणि जग, सकाळ प्रकाशन्न, पुणे २०१५.
९) उपाध्याय सौरभ, भारत में आतंकवाद, हशिका पब्लिकेशिंग हाऊस, जयपूर २०११.



**प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे**
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**डॉ. महादेव गव्हाणे**
प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर